## मराठी मंडळ ब्लुमिंग्टन-नॉर्मल, इलिनॉय

# अक्षरदीप




**ई-दिवाळी अंक - नोव्हेंबर २०१४**

## संपादिकेच्या लेखणीतून.....

नमस्कार रसिकहो! दीपावलीच्या असंख्य शुभेच्छा तुम्हा सर्वांना. ही दिवाळी तुम्ही सर्वांनी दणक्यात साजरी केली असेलच. हे येणारे वर्ष तुम्हांस आनंदाचे, सुख-समृद्धीचे, भरभराटीचे आणि आरोग्यदायी जावो ही सदिच्छा घेऊन आम्ही पुनश्च आपल्या भेटीस आलो आहोत यंदाच्या दिवाळी अंकासोबत.

मागील वर्षी आपल्या दिवाळी अंकास मिळालेला प्रतिसाद बघता आमचा उत्साह द्विगुणित झाला आणि सर्व रसिक वाचकांसाठी पुन्हा काहीतरी नवीन घेऊन यावे या उद्देशाने मंडळाचा हा द्वितीय अंक **"अक्षरदीप"** आपणासमोर आम्ही सादर करीत आहोत.

आपल्या संस्कृतीत विविध प्रकारचे सण साजरे करण्याची परंपरा आहे. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडा वेळ काढून आपण हौसेने हे सण-समारंभ साजरे करतो. मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांना भेटून शुभेच्छा देऊन गोडधोड खाऊन आनंदात हे चार दिवस आपण घालवतो. त्याचबरोबर बौद्धिक, वैचारिक भूक भागवण्यासाठी आणि सुट्टीचा सदुपयोग करण्यासाठी लेखन, वाचन गरजेचे ठरते. ह्या अंकाच्या रूपाने तो उद्देश साध्य करण्याचा छोटासा प्रयत्न आम्ही केला आहे.

ह्या अंकासाठी ज्यांनी आपले लेख, काव्य पुरवले त्या सर्वांचे मनापासून आभार! अंक वाचून आपले अभिप्राय जरूर कळवा आणि आपले प्रेम, प्रतिसाद असाच ठेवा. पुढच्या वर्षी पुन्हा भेटूया एका नव्या रंगात, नव्या ढंगात...
पुनश्च दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!!

-- सुखदा वासुदेव खोंबारे.

|| धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी, एवढ्या जगात माय मानतो मराठी ||

# अक्षरदीपमाळ...


- अभिमानास्पद घराणेशाही ------ गौरी करंदीकर
- मी भटकंती का करतो? ------ अमित मनोहर
- शब्दांचे खेळ (कविता) ------ सुखदा खोंबारे
- फेरोंच्या देशात... ------ माधुरी माटे
- ध्यानातील अनुभूति (कविता) ------ हेमा जोशी
- मी “मॅरेथॉन”करी! ------ शिरीष राणे
- नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर! ------ सुखदा खोंबारे
- मरण इतके सुंदर असू शकते..!! ------ माधुरी माटे
- रेखाचित्रे ------ वेद लोंबर, पल्लवी निकम, सुखदा खोंबारे
- सूर छेडिताना..! ------ हेमा जोशी
- चला निसर्गाच्या सान्निध्यात..! ------ वंदना बाजीकर
- Everybody needs... (कविता) ------ सुखदा खोंबारे




# अभिमानास्पद घराणेशाही..!

---- गौरी करंदीकर

सर्वसाधारणपणे प्रयत्न असा असतो की डॉक्टरचा मुलगा डॉक्टरच व्हावा, दुकानदाराचा मुलगा त्याच्या व्यवसायातच यावा.. एवढंच काय बच्चनचा मुलगा पण हिरो बनता येतेय का तेच बघणार...आणि घराणेशाही चालू ठेवणार.. सत्तेसाठी हपापलेल्या राजकारण्यांच्या किळसवाण्या घराणेशाही विषयी तर बोलायलाच नको. या सगळ्यामागे एकच सोप्पा स्वार्थी हिशेब.. मिळणा-या पैशाची, सत्तेची आणि यशाची हमी..!

पण महाराष्ट्रात अशीही एक निस्वार्थी घराणेशाही आहे की जिथे आर्थिक लाभ तर सोडाच.. उलट अपार कष्ट आणि संघर्ष आहे, वाटचाल काटेरी आहे आणि तरीही तिसरी पिढी या कार्याची पालखी खांद्यावर घेत आनंदाने हा वारसा जपते आहे.

हे घराणे आहे थोर समाजसेवक **श्री मुरलीधर देवीदास आमटे (बाबा आमटे)** यांचे!!
जून १९५१ मध्ये बाबांनी कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी 'आनंदवन' ह्या प्रकल्पाची स्थापना केली. या कार्यात बाबांच्या पत्नी **श्रीमती साधनाताई आमटे** यांनी मनापासून साथ दिली. या दोघांनी समाजाने दूर लोटलेल्या कुष्ठरोग्यांवर प्रेमाची पाखर घालून, त्यांच्यातला आत्मसन्मान जागवला, त्यांच्यामध्ये जगण्याची उमेद जागवली.. ६ कुष्ठरोगी, १४ रुपये रोख, १ आजारी गाय व सरकारकडून मिळालेली ५० एकर नापीक जमीन याआधारे लावलेल्या रोपट्याचे आज भल्या मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आहे.
**'दान माणसाला नादान बनवते, लाचार बनवते' हे बाबांचे ब्रीदवाक्य!**


समाजानं वाळीत टाकलेल्या या महारोगी बांधवांना स्वाभिमानानं जगायला शिकवायचं, स्वतःच्या पायावर उभं करायचं म्हणून बाबांनी त्यांना शेती शिकवली. गवंडीकाम करणारे काही महारोगी बांधव बाबांच्या संपर्कात आले. त्या बांधवांनी "आनंदवन" उभे केले. **इथे काय बनविले जात नाही?? अपंगांकरीता तीन चाकी सायकल, हातमागावरचे कपडे, ग्रिटींग्स, चप्पल.. ज्याला जे जमेल ते करण्यात प्रत्येक जण मग्न असतो. इथे निम्म्याहुन कमी हाताची बोटे असणारे हात बागेमध्ये हजारो फुले निर्माण करतात. समाजानं दुर्लक्षिलेले सुमारे साडे तीन हजार बांधव आज 'आनंदवना'त स्वाभिमानानं जीवन जगत आहेत.** आता या कार्याची सर्व जबाबदारी त्यांचे सुपुत्र **डॉ. विकास आमटे आणि सून डॉ.भारती आमटे** समर्थपणे सांभाळत आहेत.

बाबांचे दुसरे सुपुत्र **डॉ.प्रकाश आमटे आणि सून डॉ.मंदाकिनी आमटे** हेमलकसा, ता.भामरागड, जि. गडचिरोली येथे गेल्या ४१ वर्षांपासून लोक बिरादरी हा प्रकल्प चालवित आहेत. हा अतिदुर्गम भाग.. जायला धड रस्ते नाहीत.. स्वतःच्या मुलाच्या जन्माची बातमीही प्रकाश आमटेंना महिनाभरानंतर समजली होती.. यावरून तेव्हाच्या हेमलकशातील असुविधांची कल्पना येईल. ज्या आदिवासी बांधवांनी उपचारासाठी दिलेल्या गोळ्या रॅपरसह खाल्ल्या होत्या. त्याच भागात आज लोकबिरादरीचा सुसज्ज दवाखाना आहे. आदिवासी आश्रमशाळा उभी आहे. नक्षलग्रस्त प्रदेश म्हणून ज्या भागात जायला पोलिसही तयार नसतात असे ठिकाण त्यांनी त्या काळात सेवेसाठी निवडले. स्थानिक आदिवासी लोकांना वैद्यकीय उपचार देणे, आदिवासींना माहीत नसलेल्या शेतीच्या नवीन पद्धती शिकविणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी शाळा, ज्येष्ठ नागरिकांसाठी उत्तरायण ही निवासी संस्था, असे विविध उपक्रम येथे यशस्वीपणे चालू आहेत. आता आमटे घराण्याची

तिसरी पिढी प्रकाश आमटे यांचे सुपुत्र **अनिकेत आमटे व डॉ.दिगंत आणि स्नूषा डॉ.अनघा आमटे सुद्धा** तिथे काम करत आहेत.

**सत्तेचे आणि संपत्तीचे वाटेकरी होण्यास वारसदार आनंदाने तयार असतात, पण समाजसेवेचे खडतर व्रत चालू ठेवण्याची तयारी दाखवणारे सुपुत्र बाबांना मिळाले हे आपल्या समाजाचे भाग्यच! २०१४ हे श्री. बाबा आमटे ह्यांचे जन्मशताब्दी वर्ष. २६ डिसेंबर, २०१४ रोजी बाबांचे जन्मशताब्दी वर्ष संपन्न होईल.**

**आधुनिक भारताच्या या संताला शतश: प्रणाम.. आणि या अभिमानास्पद घराणेशाहीचा त्रिवार जयजयकार...!!!**



## मी भटकंती का करतो ??  ---- अमित मनोहर

एखाद्या आवडत्या गोष्टीत अंग झोकून द्यायचे म्हटलं किंवा मनापासुन एखादा छंद जोपासायचे ठरवले की निंदकांची घरे लगेच बोलू लागतात. आपल्यापैकी कुणीही ह्याला अपवाद नाही.. कारण या ना त्या प्रकारे असे अनुभव आपल्याला येतच असतात. कसं असते ना की समोरचा काही वेगळे करतोय हेच मुळी जनतेला पटत नाही आणि ते आपल्याला जमत नाही म्हणल्यावर मग लोक जास्तच विरोध करतात. पण कुणी काही बोलले म्हणून आपण थोडीच करायचे थांबतो??

उलट माझा अनुभव तर असा आहे की लोक बोलले की मी ख़ुनशीने मला हवे तेच करतो आणि टिकाकारांना फक्त टाळ्या वाजवायला दारात उभं करतो. आता हेच पहा ना! माझी ट्रेकिंग, हायकिंग अन् भटकायची हौस माहित असलेली मंडळीपण पहिला उपदेश नकारत्मक करतात मग इतरांची काय कथा! टिकाकारांची काही ठरलेली विधाने : "अरे तुला घरी ठेवून घेत नाहित का रे? बघावे तेव्हा बाहेर असतोस".. "बाबा सारखा कुठे उंडारत असतोस रे"... "तुझं बरं आहे तुमच्याकडे चालून जाते.. आमचं तसं नाहीये" "अरे घरी बस निवांत.. दुपारी झोप काढ मस्त"... "तू खरंच विक्षिप्त आहेस"...
"२०० km + cycling !! why are you killing yourself"???

अर्थात हे सर्व मला काही नवीन नाही. अगदी सुरुवातीपासुन हे ऐकण्याची मला सवय आहे. पूर्वी मतपरिवर्तन वगैरे करण्याचा मी प्रयत्न करायचो.. पण आता फार त्या फंदातही पडत नाही आणि आता समजुन घ्यायचं समोरच्याचं वयही राहिले नाही. बाकी फक्त टीका करायची म्हणून बोलणारे हे निरुत्साही पोटावळे नाक्यावरच्या चहाच्या टपरीवर किंवा महागड्या फडतूस हॉटेलात किंवा अंधारलेल्या मयखान्यातच सांडलेले सापडतात.

इतर प्रापंचिक जबाबदा-यातून कधी वेळ काढून सहकुटुंब सहलीला जावंच..त्यात एक वेगळीच मौज असते, पण एखादेवेळी सुटीचा अर्धा दिवस तरी दऱ्या-खोऱ्यांत जरूर घालवावा. गड किल्ले चढावेत, माळावर मनमुराद भटकंती करावी, चिंब पावसात नद्या-नाले पार करत आजुबाजूचा प्रदेश पिंजून नव्या जागा हुडकून कढाव्यात, मुलुखगिरी करावी. कधी सायकल-बाईकवरुन रपेट मारावी.. अगदीच काही नाही तर जवळपासचा एखादा डोंगर चढून जावा अन् अंगातली रग जिररावी असा साधा सरळ हिशेब!
कितीतरी गडकिल्ले अनेक वेळा पाहून झाले तरी प्रत्येक वेळी त्यात काहीतरी नवीन जाणवते. हे नाविन्य शब्दात पकडता येत नाही म्हणून कॅमे-यात धरुन ठेवायचा केविलवाणा प्रयत्न होतो.

विविधता हा तर सह्याद्रीचा स्थायीभाव.. त्यामुळेच सह्याद्रीचा कडा अन् कडा, किल्ला अन् किल्ला Unique आहे. पृथ्वीवर माणूस उपरा वाटावा अशाप्रकारे हिरव्या कॅनव्हासवर हे ताशीव उभे कडे असलेले बेलाग दुर्ग 'त्याने' उभे केलेत. कधी सहज म्हणून एखाद्या मित्राकडे जावं अन् त्याने पंचपक्वान्नाचे जेवण वाढावे त्याप्रमाणे निसर्ग आपल्याला कैक हस्ते देत असतो. आपण फक्त उघड्या डोळ्यांनी पाच पावले त्याच्याकडे जायचं.. मग तोच पाचशे पावले चालत आपल्याला सामोरा येतो.
भटकंतीला शिस्त असली तरी नियम नाही. भल्या पहाटे कुणी सोबत असेल तर तसे.. अन्यथा एकट्याने बाहेर पडावे अन् मनात येइल त्या ठिकाणाकडे मार्गस्थ व्हावे. एखाद्या धरणाचा जलाशय, सभोवार गवतावर वा-याच्या झुळकेसरशी उमटणा-या तरल लहरी अन् त्यावर पडलेल्या दवबिंदू अन् सोनेरी

किरणांमुळे होणारे special effects पहावेत. त्याला साज चढवणारी आजुबाजूला चरणा-या गोधनाच्या गळ्यातल्या घंटांची सुमधुर किणकिण ऐकावी!! हे सारच अद्भुत!

कादवे घाटाअलिकडच्या BackWater जवळ हा नादब्रह्म ऐकताना मी अंतर्मुख होतो. वरंध्यात शिरतानाच्या आडवळणावर गाडी लावून पलिकडच्या रानातल्या धबधब्यापाशी नि:शब्द बसून राहतो. ताम्हिनी परिसरामधून दिसणारी कुंडलिका valley किंवा डोंगरवाडीतून खाली पसरलेली उभी आडवी प्लस valley म्हणजे तर पर्वणी. कास परिसराचे लावण्य कधी मनाला बेधुंद करते, तर धुक्यात लपेटलेले पाटेश्वराचे रुपडे धीरगंभीर करते. पावसाने माघार घ्यायला सुरुवात झाली की सुर्यनारायण सोनसकाळी आपले पूर्वरंग उलगडतो अन् आईच्या उबदार कुशीतून तरारुन बाहेर पडलेली इवलीशी खेळकर गवतफुले नकळत हिरव्या निसर्गचित्रात रंग भरत जातात. एरवी उजाड असणा-या माळरानावर पिवळ्या, लाल, निळ्या अशा असंख्य रंगांची उधळण होते. हे स्वर्गसुख अनुभवायचे तर मयखान्यातून उठून ह्या मयसभेत हजेरी लावणे अनिवार्य आहे.

कधी भल्या पहाटे कोकणातल्या हर्णे गावाशेजारच्या डोंगरमाथ्यावर येऊन सभोवार एक नजर फेका! आयुष्य सार्थकी लागल्याचे समाधान मिळेल. डावीकडे सुवर्णदुर्गापासून हर्णे समुद्रकिनारा पाहत अंजर्ल्याचा कड्यावरचा गणपती अन् त्यापलीकडचं केळशी कवेत घ्यावेसे वाटते. अगदी भर दुपारचे लालेलाल तामसतीर्थ काय किंवा सांजवेळी गोपाळगडावरुन दिसणारा नितांतसुंदर सुर्यास्त काय हे तिथे जाऊन आल्याशिवाय समजणार नाही.

रहाटगाडग्याकडे परतण्यशिवाय पर्याय नसतो हे मान्य! पण एखादा दिवस, घरी बसून TV पहाण्यापेक्षा BagPack पाठीला लावून वाट फुटेल तसे जावे! दिवसभर पायपीट करुन एखाद्या झाडाखाली बसकण मारावी, झोपडीतली भाजी-भाकरी-पिठलं खावे. जोडीला मडक्यातलं दही अन् बाजुच्याच झऱ्याचं थंडगार मिनरल water प्यावे आणि घरी जायच्या आधी एकदा कड्यावरुन पश्चिमेकडला अल्हाददायक थंडावा निवणा-या दिवाकराने उभ्या केलेल्या सुर्यास्ताच्या देखाव्यासोबत अनुभवावा.

एरवी 'मी, मी' म्हणणारे आपण ह्या शक्तिसमोर कितीतरी खुजे होऊन जातो. हवेतून चालणा-या आपल्यासारखा हलका माणूस प्रकृतीच्या सान्निध्यात येतो, तसा आपल्यातला 'अहम्' गळून पडतो अन् आपण 'त्या' शक्तीने भारले जातो. एरवी चार कपर्दिकांभोवती घुटमळणा-या आपल्या नजरेला एक नवा दृष्टीकोन मिळतो. आपण प्रगल्भ तर होतोच, पण सर्वात महत्वाचे म्हणजे एक माणूस म्हणून आपण घडतो.

मी चालतो अखंड चालायाचे म्हणून, धुंदीत या गतीच्या सारेच पंथ प्यारे
डरतात वादळांना जे दास त्या ध्रुवाचे, हे शीड तोडले की अनुकूल सर्व वारे!
चुकली दिशा तरीही हुकले न श्रेय सारे, वेड्या मुशाफिराला सामील सर्व तारे..
-- विं.दा.करंदीकर

पहा आमची कोकण वारी - Kokan Cycle Ride - A Movie

# शब्दांचे खेळ...

---- सुखदा खोंबारे

दोन व्यक्ती एकमेकांशी बोलतात तेव्हा तो संवाद,
दोन व्यक्ती एकमेकांशी भांडतात तेव्हा तो वाद..
दोन व्यक्ती एकमेकांची काळजी घेतात तेव्हा ती आपुलकी,
दोन व्यक्ती एकमेकांच्या गरजेला धावून जातात तेव्हा ती माणुसकी..
जगण्यासाठी आपण घेतो तो श्वास,
नाती टिकण्यासाठी लागतो तो विश्वास..
दुःखाच्या वेळी आपण एकमेकांना देतो तो आधार,
तेच माणसाचे मन दुखावते ती शब्दांची धार..
आपल्यावर संस्कार करतात, आपल्याला घडवतात ती आपली माणसं, आपली माती,
आणि एकमेकांना सांभाळून जगायला शिकवतात ती आपली नातीगोती..
एखादी गोष्ट आपल्याला हवी असते म्हणून आपण तिला जवळ करतो ते कवटाळणे,
तेच आपल्याला नको आहे म्हणून पाठ फिरवणे म्हणजे टाळणे..
आपल्या मनाविरुद्ध काही घडले की होतो तो संताप,
आणि आपल्या मनाविरुद्ध इतर कुणी वागले की होतो तो मनस्ताप..
इतरांचे हित चिंततात, सर्वांशी सभ्यपणे वागतात ते सज्जन,
आणि नुसत्याच बढाया मारतात, पोकळ आश्वासने देतात ते बोलबच्चन...
वयोमानानुसार वाढत जाते, माणसाला सुज्ञ बनवते ती असते समज,
आणि एकमेकांविषयी द्वेष, मत्सर निर्माण करतात ते असतात गैरसमज...
कुणासमोर लाचारी न पत्करता ताठ मानेने जगणे म्हणजे स्वाभिमान,
आणि एखाद्या गोष्टीबद्दल अतीव आदर, गर्व वाटणे म्हणजे अभिमान...
भाषेचा असा गोडवा दाखवतात ते शब्दांचे खेळ,
पण हेच शब्द वापरताना राखला पाहिजे आपण ताळमेळ...!!

# फेरोंच्या देशात... ---- माधुरी माटे




गेल्या महिन्यात "प्रिन्स ऑफ इजिप्त" हे कार्टून पाहिले (सुरूवातीला वाटले की कंटाळवाणे असेल पण छान आहे) आणि आमच्या इजिप्तायनची आठवण ताजी झाली. सौदी अरेबियात रहात असताना दुबई, बहारेन हे बाजूचे देश बघून झाल्यावर इजिप्तला जावे असे विचार सुरू झाले. पिरॅमिडस बघणे हा एक इंटरेस्ट होताच. सौदीत त्यावेळेस (१९९६-९७) इंटरनेट एवढे फास्ट नव्हते.. त्यामुळे रिसर्च लिमिटेड करता आला. अर्थात आधी जे लोक जाउन आले त्यांनी भरपूर माहिती दिली (मैत्रिणींचे नेटवर्क केव्हाही जास्त माहिती देते). इजिप्त मध्ये बरेच लोक नाईल क्रूज घेउन देश बघतात.. पण आम्हाला रजा फक्त ५-६ दिवस मिळत होती आणि आमची मुलगी ८-९ वर्षाची होती म्हणून आम्ही ५ दिवसांची टूर ठरवली. टूर कंपनीने आमचा प्रोग्रॅम दिला व आमची तयारी सुरू झाली.




इजिप्तला चाललाय तर जरा जपून, असा सल्ला प्रत्येकाने दिला. तिथे चो-या खूप होतात. पासपोर्ट पळवतील, जास्त पैसे बाळगू नका. दुकानात खूप बार्गेन करा अशा महत्वाच्या सूचना मैत्रिणी करत होत्या. तिथे पोचल्यावर पहिला एक दिवस मी प्रत्येक माणसाकडे संशयित नजरेने बघत होते, पण आमच्या पूर्ण स्टे मध्ये आम्हाला सगळे चांगले लोकच भेटले, कोणी लुबाडले नाही. सौदी व इजिप्त तसे शेजारी देश.. मध्ये फक्त रेड सी आहे. विमानातून जाताना रेड सी छान दिसतो. सुएझ कॅनॉल वरून बघताना अगदी मॅप बघतोय असे वाट्त होते. खूप क्लिअर दिसत होते. कैरो एअरपोर्ट वर उतरलो. अगदीच साधारण असा एअरपोर्ट आहे. एखादी शेड किंवा बस स्टँड सारखा वाटला. दारात आमचा गाईड आमच्या नावाची पाटी व गाडी घेउन उभा होता. ही आमची पहिलीच अशी एस्कॉर्टेड टूर असल्याने मजा वाटत होती. पुढचे ५ दिवस आम्ही आम्हाला त्या गाईडच्या हवाली करून टाकले. हॉटेल वर पोचेपर्यंत अंधार पडला. रूम ताब्यात घेतली. दुसऱ्या दिवशी ८ वाजता गाईड येणार होता. सहज खिडकीतून बाहेर पाहिले तर अंधारात पिरॅमिड सारखे काहीतरी दिसत होते. काहीतरी टेकडी सारखे असावे म्हणून आम्ही झोपलो. सकाळी उठल्यावर खिडकीतून बाहेर पाहिले तर चक्क पिरॅमिडस दूरवर दिसत होते. आधी हॉटेलची अशी सिच्युएशन माहित नसल्याने आम्हाला हे एक छान सरप्राइज होते. बरोबर ८ वाजता गाईड हजर होता हा दुसरा सुखद धक्का.

पहिल्या दिवशी पिरमिड्स बघायचे होते. तिथले लोकल्स पिरमिड्स असा उच्चार करतात. या देशात खूप पिरॅमिडस आहेत. सुरूवातीला स्टेप्स पिरॅमिडस बांधत असत. नंतर पूर्ण पिरॅमिड शेप मध्ये बांधू लागले. गिझाचे तीन फेमस आहेत. हे गावापासून तसे दूर आहेत, पण लांबवर दिसतात. आजूबाजूला उंच इमारती बांधायला बंदी आहे. आम्ही तिथे पोचलो तेव्हा बरीच गर्दी होती. लक्षात येण्याइतके जपानी टूरिस्ट होते. तीन पैकी एका पिरॅमिड्च्या आत जाता येते. कॅमेरा न्यायला बंदी होती. आत जाताना पिरॅमिडचा आतला नकाशा देतात म्हणजे तुम्ही कुठे आहात त्याची कल्पना येते. आतमध्ये जाताना वाकून एका चिंचोळ्या जिन्याने जावे लागते. आत बरिअल चेंबर आहे. बाकी सगळ्या गोष्टी म्युझिअम मध्ये आहेत. त्यामुळे आत जाऊन काही विशेष बघायला मिळत नाही. बाहेरही बरीच पड्झड झालेली आहे. पण एकंदर त्या स्ट्रक्चरची भव्यता खूप छाप पाडते. त्याकाळी एवढे मोठे दगड कुठुन, कसे आणले, इतके वर कसे चढवले, कॉम्प्युटर शिवाय इतके अचूक मोजमाप कसे केले आहे हे सगळे मति गुंग करणारे आहे. हे दगड एकमेकात बसवताना सिमेंटचा वापर कुठेही नाही. मोठे दगड लॉक ऍंड की अरेंजमेट ने बसवले आहेत. गेले ५००० वर्ष हे स्ट्रक्चर इनटॅक्ट आहे. पाउस, वारा झेलूनही तितक्याच कणखर पणे ते उभे आहे. बऱ्याच लोकांनी लढायांमध्ये वरचा लाइम स्टोनचा गुळगुळीत, चमकदार भाग नष्ट केला आहे. जेव्हा हे पिरॅमिडस बांधले तेव्हा खूप सुंदर दिसत असतील. आतमध्ये किंगचे कॉफिन आहे दगडाचे बनवलेले. नकाशा बघितल्या मुळे आपण पिरॅमिड च्या नक्की कुठल्या भागात आहोत हे कळते, नाहीतर काही कल्पना येत नाही. एकंदर पिरॅमिडस ग्रेट आहेत. या पिरॅमिडसच्या बाजूला स्फिंक्स आहे. तो म्हणे बाहेरून रक्षण करतो. याचे तोंड माणसाचे (राजाचे) व शरीर सिंहाचे आहे. कुणीतरी त्याचे नाक कापायचा प्रयत्न केला आहे. आम्ही गेलो तेव्हा डागडुजी चालली होती. या बांधकामात लाईम स्टोन खूप वापरला आहे. या पिरॅमिडसचे आकार व जागा याबद्दल ब-याच गोष्टी सांगतात. एका ठराविक कॉन्स्टिलेशनकडे ते पॉईंट करतात. मृत्यू नंतर माणूस तिथे प्रवेश करतो असे काही समजतात. नाईलच्या पश्चिमेला ते आहेत, तिथे सूर्य अस्त पावतो म्हणून ते मृत्यूच्या दिशेला आहेत असे काही म्हणतात. या आकारात वस्तू ठेवली की ती खराब होत नाही म्हणून पिरॅमिडचा शेप निवडला असे काहींचे म्हणणे. गिझाच्या मोठ्या वालुकामय पठारावर ते दिसतात मात्र सुंदर..! संध्याकाळी ते अजूनच छान दिसतात. आम्ही २ दिवसांनी तिथे असलेला लाईट व साउंड शो पाहिला...खूपच सुंदर इफेक्ट्स होते. लाईट मुळे तो सगळा परिसर खूपच वेगळा वाटत होता. आणि बरोबरच्या कॉमेंटरी मुळे इतिहासाची पानेही उलगडली जात होती.


इजिप्त मध्ये गाईडसचा सुळसुळाट आहे. खूप जनता त्यावर रोजी रोटी कमावते. खूप तरूण मुले इजिप्तॉलॉजी हा विषय शिकतात व गाईडचे काम करतात. आम्ही दोन तीन गाईडचा अनुभव घेतला. तिथे हिंडताना असे जाणवले की जर इथे टूरिझम संपला तर हे लोक काय करतील? सगळे धंदे टूरिस्ट शी निगडीत. इस्लाम धर्म इथे जास्त पाळला जातो. आमच्या एका गाईडने आम्हाला विचारले की आमच्या कुराणा सारखे तुमचे काय पुस्तक आहे? त्याला सांगितले थोडेसे गीतेबद्दल व वेद-उपनिषदाबद्दल आणि मग सांगितले की हे वाचले नाही तरी आम्ही हिंदूच रहातो. कुंकू लावले नाही तरी हिंदू रहातो. त्याला एवढे आश्चर्य वाटले. तुम्ही कुठ्लेच पुस्तक फॉलो न करता तुमच्या धर्मात कसे रहाता हे काही त्याला समजेना. मग मी त्याला विचारले, "तुम्ही देव मानत नाही मग इथल्या सगळ्या जुन्या गोष्टी, देवळे यात कसे जाता"? कारण त्यांच्या धर्मात मूर्तीपूजा वर्ज्य आहे. तो म्हणाला, "पॊटासाठी करतो दुसरे काही नाही". नाहीतर हे लोक धर्माच्या बाबतीत अगदी कट्टर.




नंतर आम्ही उंटावरून राईड घेतली. आधी थोडी घासाघीस झाली किमतीबद्दल- मग तो तयार झाला. आम्ही तिघे व दोन उंट असे आम्ही निघालो. अर्ध्या रस्त्यात आल्यावर तो म्हणू लागला, जास्त पैसे द्या नाहीतर मी उंट सोडून जातो....करता काय अडला हरी उंटवाल्याचे पाय धरी. आम्ही जास्त पैसे देऊन खाली उतरलो. (एवढाच हिसका आमच्या प्रवासात मिळाला) त्यानंतर आम्ही हॉटेलवर आलो. आम्ही हॉटेल पिरॅमिडस मध्ये उतरलो होतो. छान जागा होती. खिडकीतून पिरॅमिड्स दिसत. इथले डेकोरेशन आणि ब्रेकफास्ट एकदम राजेशाही. जवळच लोकल खाण्याची दुकाने होती(स्वस्त आणि मस्त). इथल्या खाण्यावर ग्रीक, लेबनीज खाण्याचा परिणाम झाला आहे. तिथे आम्ही फिलाफिल सँडविच व ज्यूस बऱ्याच वेळा खात असू. हमूस, ताहिनी या चटण्यांचे प्रकार छान होते. बाबागनूष हा वांग्याचा प्रकार होता, थोडेसे आपल्या भरतासारखे. एकदा भात व डाळी सारखे काहीतरी ट्राय केले. बकलावा हे स्वीट छान होते. बाकी पिटा ब्रेड, शवरमा, पिझ्झा हे होतेच. सतत टूरिस्ट येत असल्याने वेगवेगळे खाणे उपलब्ध होते. रात्री नाईल नदीतून क्रूझचा प्रोग्रॅम होता. तिथेही जेवण, म्युझिक होतेच. कैरो बद्दल माहिती सांगून मेन बिल्डिंग्ज दाखवत होते. त्यानंतर एका बेली डान्सरने डान्स केला. ती एवढी फास्ट नाचत होती आणि इतके प्रकार करून दाखवत होती की आम्ही बघूनच दमलो.

पुढचा दिवस कैरो मधले इजिप्शिअन म्युझिअम बघण्यात गेला. (कमीच पडला). हे सगळ्यात जुने म्युझिअम समजले जाते. इजिप्शिअन संस्कृती सगळ्यात जुनी असल्याने इथले सगळे (लायब्ररी, म्युझिअम, युनिव्हर्सिटी, दवाखाने) हे 'सगळ्यात जुने' या कॅटॅगिरीतले. नंतर नंतर गाईडने एखादा जुना किल्ला किंवा इमारत दाखवली की आम्ही म्हणत असू हे सगळ्यात जुने किंवा पहिले असेल ना.....सकाळी आधी कागद कसा बनवतात ते बघायला गेलो.

पपायरसच्या झाडापासून कागद कसा बनवतात याचे छान डेमो होते. पपायरसच्या झाडाची पाने भिजवून, त्याचा लगदा करून प्रेसच्या सहाय्याने ती सपाट करतात. मग वाळवून वेगवेगळ्या तऱ्हेच्या कागदात रूपांतरीत करतात. आपल्या समोर कागद बनताना पाहून छान वाटते. आम्ही आपले नाव त्या कागदावर लिहून घेतले. नंतर त्याच्यावर लिहितात कसे, तिथली लिपी कशी होती याबद्दल माहिती दिली. मध्यंतरी काही काळ ही लिपी कुणाला समजत नव्हती. कारण त्याचे डॉक्युमेंटेशन नव्हते. काही दिवसांनी लिपी व त्याचा अर्थ लिहिलेली एक शिला सापडली आणि पुढचे काम सोपे झाले. याला हिलोग्रिफिक्स म्हणतात. २००० च्या वर सिंबॉल्स असल्याने अतिशय कॉम्प्लेक्स असा हा प्रकार आहे. यातले प्राणी व पक्षी या लेखनाची दिशा दाखवतात. ती वरून खाली, डावीकडून उजवीकडे किंवा उजवीकडून डावीकडे लिहिता येते. इथल्या सगळ्या टूम्ब्स मध्ये, देवळात, भिंतीवर याच लिपीत मजकूर लिहिला आहे. आम्ही कुठेही गेलो की गाईड आधी टॉर्च मारून त्यावरची लिपी दाखवायचा आणि ती स्टोरी सांगायचा. पूर्वीच्या काळी काढ़लेली पेंटींग्स, चित्रे म्हणजे चक्क इतिहासाची पुस्तके आहेत हे पटते. एकदम इंटरेस्टींग प्रकार वाटला.




त्यानंतर म्युझिअम कॉम्प्लेक्स कडे गेलो. हे म्युझिअम खूप भव्य आहे. सगळ्या पिरॅमिडस मधले सोने, ममीज आणि इतर ऐवज इथे ठेवलेले आहे आणि मुख्य म्हणजे टिकवले आहे. आत गेल्या गेल्या कॉम्प्युटर वर नकाशा होता.. त्यावरून आम्ही काय काय बघायचे ते ठरवले कारण सगळे एका दिवसात बघणे अशक्य. सुंदर पुतळे, कोरिव काम केलेल्या गोष्टी, सोन्याच्या वस्तू इथे खचाखच भरलेल्या आहेत.

तुतानखामुन हा इथला सगळ्यात तरूण राजा. तो अगदी तरूणपणी गेला. त्याचे एक पूर्ण दालन आहे. त्याला ६-७ पेट्यांच्या आत ठेवले होते. त्या सगळ्यावर सोन्याचे कोरिव काम आहे. याचा मुकुट भरीव सोन्याचा आहे. या लोकांना मृत्यूनंतरच्या जीवनाची फार काळजी. फेरो नंतर देव बनतात त्यामुळे त्यांना ममी करून, त्याच्या सगळ्या वस्तू त्या राजाबरोबर पुरत असत. राजासाठी रक्षक, त्याचे मौल्यवान सामान, इतर महत्वाच्या गोष्टी त्याच्या बरोबर पुरत असत. नंतर ह्या सगळ्या गोष्टी चोरीला जाऊ लागल्या. म्हणून पिरॅमिडस अजून अजून मजबूत बांधायला सुरूवात झाली. ममी करायचे तेत्र कुठेही डॉक्युमेंटेड नाही, पण शरीराचे महत्वाचे चार अवयव (आतडी, फुफ्फुस, लिव्हर व पोट) बाहेर काढून त्यातील पाणी काढून त्यांच्यावर केमिकल लावत असत. नंतर उरलेली बॉडी ट्रीट करत. पाण्याचा अंश पूर्ण काढत असत कारण पाण्यामुळे बॅक्टेरिआ शरीर खराब करतात. ४० दिवसांनी सगळे अवयव आत घालत अथवा जार मध्ये ठेवत व बॉडीला लिननच्या पट्ट्यांनी गुंडाळत. अशा प्रकारे तयार केलेली बॉडी बघून, साधारणपणे माणूस पूर्वी कसा दिसत असेल याची नंतर बरेच वर्ष कल्पना येई. म्युझिअम मध्ये एका दालनात ममीज ठेवल्या आहेत. अर्थात त्यासाठी जास्तीचे तिकीट होते. आपल्या व इजिप्शिअन लोकांच्या त्या काळच्या समजुती बऱ्याच सारख्या आहेत. देव देवता, मृत्यु नंतरचा पाप पुण्याचा हिशोब, मृत्यु देवता, सूर्य, जल देवता वगैरे. बऱ्याच ठिकाणी एक पेंटिंग पहायला मिळाले. मरणानंतर माणसाच्या पाप पुण्याचा हिशोब चालू आहे आणि तराजू मध्ये एका बाजुला पिस ठेवले आहे व दुसरीकडे त्या माणसाचे कर्म. ब-याच पेंटींग मध्ये वेगवेगळ्या देवांच्या गोष्टी रेखलेल्या आहेत. त्यासाठी वापरलेले रंग अजूनही चांगले आहेत.

खान ए खलिली हा इथला मोठा बाजार. रस्त्यावर व छोट्या दुकानात हा बाजार भरतो. विक्रेते हिंदी लोक दिसले की राज कपूर, जंजीर असे सांगून गोष्टी गळ्यात मारायला बघतात. बॉलीवूड अगदी जगाच्या कानाकोपऱ्यात आपल्याला भेटत असते. कापड, खाणे, शोभेच्या वस्तू, अत्तर सगळे इथे हजर आणि वाजवी किमतीत. मैत्रिणींनी किमतीची आधीच कल्पना दिल्याने छान बार्गेन करता आले. पत्र्यावार ठोकून बनवलेल्या फ्रेम्स, पिरॅमिडसचे सेट, वेगवेगळे स्टॅच्यू, कॉटन कफ्तान अशी बरीच खरेदी झाली. एका अत्तराच्या दुकानात आमचा गाईड घेउन गेला. तिथे अनेक प्रकारची अत्तरे होती. बाटल्यांचे आकार व रंग फारच सुंदर. अत्तरापेक्षा मी बऱ्याच बाटल्या घेतल्या आणि त्या न फुटता घरी पोचल्या.

अलेक्झांड्रिया.. कैरोपासून ४ तासावर अलेक्झांड्रिया आहे. आम्ही ट्रेनने गेलो. अगदी पुणे-मुंबई सारखा प्रवास वाटला. ही ट्रेन आली तेव्हा त्यावर कुठेही इंग्लिश लिहिलेले नसल्याने दोनदा विचारून

आम्ही बसलो. रूळावर ही ट्रेन घसरत जाते त्यामुळे वेगळे फिलिंग येते. ट्रेन मधल्या खुर्च्या १८० फिरवता येतात. अगदी साध्या ट्रेन्स असल्या तरी सगळ्या सिस्टीम्स व्यवस्थित चालतात. टूरिझम साठी हे आवश्यक आहे. नरीमन पॉईंट सारखा इथला रस्ता वाटतो. आम्ही सिसिली नावाच्या रेस्टॉरंट मध्ये गेलो. तिथून व्ह्यू खूप छान दिसतो (एका मित्राचे रेकमेंडेशन...नाही तर अशा गोष्टी एकदम कशा सापडणार?)



इथली लायब्ररी प्रसिद्ध आहे. ही रिनोवेट केलेली आहे. अलेक्झांडरने सगळी उत्तमोत्तम पुस्तके हवीत म्हणून सगळ्या जगातून इथे पुस्तके जमवली आहेत. कुठल्या का कारणाने होईना पुस्तकांचे सुंदर कलेक्शन आहे. जगातला कुठलाही पेपर इथे मिळू शकतो. लायब्ररीचे ऑपन डिझाईन असे आहे की आत नॅचरल लाईट भरपूर. वरती डोळ्याच्या पापण्यासारखे डिझाईन आहे. अतिशय सुंदर आर्किटेक्चर....ऑपन मजले आहेत. त्यानंतर हुस्ने मुबारक (प्रेसिडेंट) चा राजवाडा पाहिला. तो रहात असला तरी पहायला परवानगी होती. खूप मोठा आहे. मुस्लीम आर्किटेक्चर कळून येते. संध्याकाळी एक सागरी किल्ला पाहिला. अगदी आपल्या किल्ल्यांची आठवण झाली. तोफा ठेवायची जागा, भुयारे,कोठार वगैरे. बाहेर येऊन समुद्राकाठी उभे असताना समोर लांबवर दिवे दिसत होते. मध्ये मेडिटेरेनिअन समुद्र...पलिकडे टर्की, युरोप. परत एकदा नकाशाच बघतो आहोत असे वाटले. युरोप जवळ असल्याने अलेक्झांड्रिआतली लोके दिसायला वेगळी आहेत. युरोपिअन छाप काही लोकांवर दिसते. एकंदरीने इजिप्शिअन दिसायला छान होत्या. सौदीत मी जेवढे इजिप्शिअन पाहिले ते सगळे जाड होते म्हणून माझी समजूत झाली होती की सगळे जाड असतील. संध्याकाळी ट्रेन पकडून आम्ही परत कैरोला आलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी एका टॅक्सी वाल्याला घेऊन आम्ही ऑऍसिस बघायला गेलो. वाळवंटात हे पाण्याचे साठे कुठुन सापडतात हे नवलच आहे. त्या पाण्यामुळे आजूबाजूला झाडॆ, वस्ती होते. वाटेत एक टिपीकल खेडे तयार केले होते...त्यात नवीन काही वाटले नाही कारण आपल्याकडे अशी खेडी भरपूर. त्यानंतर समुद्रकिनारी गेलो तिथे छान शिडांच्या बोटी दिसत होत्या. आम्ही त्यात बसणार होतो, पण वारे खूप होते आणि पाणी गार होते म्हणून आम्ही तिथून लवकर निघालो. आम्ही गेलो तो सिझन रमादानचा होता. आमच्या टॅक्सीवाल्याला उपास सोडायचा होता. तो त्याच्या घरी घेऊन गेला. अगदी साधे घर होते. मग खजूर दिला. त्याचा उपास सुटला. घरात त्याची फॅमिली, आई वडील होते. आश्चर्य म्हणजे सगळे शिकलेले होते. परत जाताना एका बाजूला खजूराची झाडे व सूर्य अस्ताला चाललेला. खूप छान उजेड होता आणि आकाशाच्या कॅनव्हासवर एक सुंदर निसर्गचित्र काढल्यासारखे दिसत होते.

इजिप्तचे सगळे महत्व नाईल मुळे आहे. या नदीच्या भोवती फक्त वस्ती आहे.. बाकी सगळे वाळवंट. नाईल जिथून जाते तो भाग मात्र अगदी समृद्ध आहे. नकाशात बघितले तर ही गोष्ट सहज लक्षात येते. नाईलला दर वर्षी पुराचा तडाखा बसत असे. आस्वान इथे त्यावर धरण बांधल्याने हा प्रश्न सुटला. हे एक आंतरराष्ट्रीय प्रॉजेक्ट आहे. त्यामुळे वीज पुरवठा भरपूर झाला. नाईल क्रूज वर भरपूर टूरिझम चालतो. ही नदी दक्षिणेकडून उत्तरेला वहाते कारण तिथली भौगोलिक परिस्थिती, चढ उतार तसे

आहेत. त्यामुळे काही लोक तिला उलटी वहाणारी नदी म्हणतात. दक्षिणेकड्च्या भागाला अप्पर इजिप्त व उत्तरेकडच्या भागाला लोअर इजिप्त म्हणतात.



इजिप्त मध्ये टेंपल्सचे बरेच महत्व आहे. प्रत्येक राजा, फेरो आपल्या नावाचे मोठे टेंपल व मोठा पिरॅमिड बांधत असे. गुलामांचा वापर करून मोठाल्या शिळा दगड हलवले जात. नदी मधून बोटीतून दगड आणताना बाजूला बऱ्याच बोटी बॅलन्सिंग साठी लावाव्या लागत.. कारण वजनाने पाणी खूप डिसप्लेस होत असे. अबू सिंबलची टेंपल्स धरणाच्या मध्ये येत होती, म्हणून ती चक्क कापून एक मैल अंतरावर परत जशीच्या तशी बांधली. हेही एक मोठे आंतरराष्ट्रीय प्रॉजेक्ट होते. इजिप्तच्या इतिहासाने इतक्या लोकांना वेडे केले आहे, त्यामुळे मदत मागितल्यावर बऱ्याच लोकांनी हात पुढे केला. अजूनही तिथे खोदकाम करणारे परदेशी जास्त दिसतात. लेझर किरणांनी जुने मंदिर तुकड्यात कापून एक मैलावर परत जिग सॉ पझल सारखे बांधले, खरोखर कमाल आहे. या देवळात सूर्याचे किरण ठराविक ठिकाणी मूर्तीच्या अंगावर पडतील अशी रचना त्याकाळी केलेली होती. काय टेक्नॉलॉजी होती माहित नाही. कुठे लिहून ठेवले असते तर मजा आली असती. रॅमसे २ यानेही लक्झर येथे प्रचंड मोठी टेंपल्स बांधली आहेत. त्यातल्या मूर्ती व त्यांची भव्यता बघण्यासारखी आहे. या देवळात बऱ्याच वेळा रा (सूर्य) दिसतो. सिंहासन, देवाची वाहने, आकाश पाताळ सगळे कन्सेप्ट भेटतात.

आम्ही अमेरिकेत आल्यावर लास व्हेगासला गेलो.. तेव्हा लक्झर हॉटेल मध्येच राहिलो होतो त्याचेही आर्किटेक्चर छान आहे. त्यांनीही ब-याच मूर्ती, पिरॅमिडस चा आकार ठेवला आहे. परवा इजिप्तायन हे पुस्तक वाचले आणि इतर अनेक ठिकाणांबद्दल माहिती मिळाली. पुस्तक खूप डिटेल मध्ये आहे. इजिप्तला जाताना मनात वाटत होते काय ते जुने बघायचे पण बघण्यासारखे खूप आहे. पर्यटकांसाठी सोयी भरपूर आहेत. तिथली माणसे फसवत नाहीत असे मी म्हणेन. तिथल्या गोष्टी पहाताना पुन्हा एकदा जाणवले आपल्याकडे केवळ सोयींची कमतरता असल्याने कितीतरी छान देवळे, किल्ले हे परदेशी लोकांपासून दूर रहातात. आता ठराविक ठिकाणी थोड्या सोयी आहेत पण अगदीच कमी. आपली संस्कृतीही अशीच जुनी आहे. तिथे गेल्यावर जाणवले की हा देश तसा अगदीच गरीब आहे.. पण या टूरिझमने त्यांनी जगाच्या नकाशावर महत्वाचे स्थान मिळवले आहे हे नक्की.

आत्ता झालेल्या सत्तांतराच्या वेळच्या गोष्टी, दंगा पाहून त्या वेळीच इजिप्तला गेलो हे फार छान झाले असे वाटले.. कारण आता परिस्थिती बदलली आहे.

# ध्यानातील अनुभूति..!

---- हेमा जोशी, पुणे


आज पहाटे ध्यानात रंगले मी स्वामींच्या
अंतःचक्षूसमोर चमकल्या छटा विविध रंगांच्या
श्वासावरती मंद लयीवर सूर घुमें 'स्वामी समर्थ'
देहभान विसरले अणू रेणु झंकारले जप झाला सार्थ
अन् बघता बघता एक विस्मय नवल घडले
'साई समर्थ' नाव मुखी येऊ लागते
नाद श्री स्वामीनामाचा अनंतात जणू विरुनी गेला
श्री साईनामाचा जयघोष अंतर्मनी रंगू लागला
आज अचानक हे असे कसे घडले?
श्री स्वामी समर्थ अन् श्री साई 'एकच' हे सत्य उलगडले
पुनश्च समोर स्वामी दिसले ओठावर स्मित प्रसन्न
नम्र भाने वंदन करता दिधले मंगल आशीर्वचन
'सलामत रहो बेटा' शब्द कानावर पडले
स्वामीमुखी साईंचा आवाज ऐकूनी स्तिमित मी झाले
हस्तस्पर्श स्वामींचा होता चित्तास आली जागृती
साईनाथ स्वामी समर्थ ऐक्यभावाची लाभली पूर्ण प्रचिती
नयनी अश्रु दाटूनी आले हृदयी वाहे प्रेमझरा
क्षण दिव्य अनुभूतिचा हा खराखुरा
या हृदयीचा भाव त्या हृदयी समजला
सद्गुरु कृपेचा महिमा मनोमनी उमगला
मोक्षसुखाचा आनंद त्यागूनी संत भूमीवरी का येती?
अपार माया भक्तावर करूनी उद्धार त्यांचा करिती
श्री स्वामीराया आपण उलगडले मर्म संतजीवनाचे
साई स्वामी एकरूप दर्शन लाभले आज भाग्याचे ........

# मी "मॅरेथॉन"करी!

------ शिरीष राणे




यावर्षी प्रदर्शित झालेल्या "लय भारी" या चित्रपटातील "माऊली माऊली" या गाण्याने पंढरपूरच्या वारीचं दर्शन झाले. वारीत ऊन, वारा, पावसाची पर्वा न करता विठ्ठल नामात दंग झालेला वारकरी पाहिला.. मुखात विठूनामाचा जयघोष आणि माऊलीच्या दर्शनाची ओढ, हे सारं बघून मन प्रसन्न झाले. वारीतल्या वारकऱ्यासारखीच अवस्था "शिकागो मॅरेथॉन" मध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येकाची असते. ऊन वाऱ्याची पर्वा न करता केलेला सराव आणि जिम मध्ये ट्रेडमिल वर गाळलेला घाम हे सारं या स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येकाच्या मनात गेल्या वेळेपेक्षा कमी वेळात यावर्षी ही स्पर्धा पूर्ण करण्याची इच्छा जागवते.



तरुण असो व वृद्ध, स्त्री असो व पुरुष, या स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येक जण या मॅरेथॉनच्या प्रेमात बुडालेला असतो. यातल्या प्रत्येकाला ही स्पर्धा सुरु होण्याची आणि आपले या वर्षीचे टार्गेट पूर्ण करण्याची ओढ लागेलेली असते. "शिकागो मॅरेथॉन" मध्ये धावण्याची माझी ही दुसरी खेप... गेल्या वर्षी पहिल्यांदा या स्पर्धेत भाग घेतला होता.

आदल्या दिवशी मॅरेथॉन Expo मध्ये जाऊन बिब आणि टी-शर्ट घेतल्यावर ४:३० तासाच्या Pace Team मध्ये माझं नाव नोंदवून आलो. मॅरेथॉनच्या सकाळी मनात एक घालमेल सुरु होती.. मनात सारखा एकच विचार.... गेल्या वर्षीपेक्षा कमी वेळेत पूर्ण करू शकलो नाही तर? ४:३० तासांचं टार्गेट पूर्ण झालं नाही तर? या सर्व विचारांनी रात्रीची झोप सुद्धा नीट झाली नव्हती. सकाळचा *pre-race* नाश्ता करून, सेजल आणि यश कडून भरपूर शुभेछा घेऊन मी आणि माझा मित्र सुरेश होल्डिंग *area* च्या दिशेने निघालो. रस्त्याच्या दुतर्फा मॅरेथॉन मध्ये भाग घेतलेल्या आणि त्यांना शुभेछा द्यायला आलेल्या लोकांची गर्दीच गर्दी दिसत होती. पाच मिनिटे चालल्यावर आम्ही होल्डिंग *area* मध्ये पोहोचलो. अमेरिकेचे राष्ट्रगीत संपल्यावर ठीक ७:३० वाजता मॅरेथॉनची सुरुवात झाली व साधारण १२ मिनिटांत मी Start Line

पर्यंत पोहोचलो. गेल्या वर्षीच्या अनुभवावरून यावर्षी मी सुरुवातीला कमी वेगात धावून पहिल्या तासानंतर माझा वेग वाढवण्याची रणनीती आखली होती आणि ती चांगलीच यशस्वी झाली. मी अर्ध मॅरेथॉन म्हणजेच १३.१ मैल २:११ तासात पूर्ण केले. ही माझी अर्ध मॅरेथॉन पूर्ण करण्याची सर्वोत्तम वेळ होती (या आधी मी ३ वेळा मुंबई अर्ध मॅरेथॉन धावलो आहे). पण खरी परीक्षा तर उरलेले १३.१ मैल धावण्याची होती. माझा अनुभव असा आहे की जेव्हा जेव्हा माझ्या आयुष्यात कठीण प्रसंग येतात तेव्हा अशा काही घटना घडतात की मला त्या कठीण प्रसंगावर मात करण्याचे प्रोत्साहन देऊन जातात. ही दैवी शक्ती म्हणा की माझं भाग्य.. माझ्यासमोर गेल्या दोन वर्षीप्रमाणे याहीवर्षी Prosthetic Leg लावून धावणारा स्पर्धक दिसला! त्याला धावताना पाहिल्यावर माझे मनोबल वाढले आणि मी ठरवलेल्या वेळेत पूर्ण करू शकतो याची खात्री पटली. अशी माणसे मला नेहमीच प्रेरणा देऊन जातात. मनात अशा व्यक्तींच्या धैर्याला सलाम करून मी माझे धावणे सुरु ठेवले.




शिकागो पोलिस आणि स्वयंसेवक त्यांची जबाबदारी अत्यंत चोखपणे पार पाडत होते. शिकागो मॅरेथॉनचा संपूर्ण मार्ग लोकांनी फुलला होता. तिथे जमलेले सगळे लोक स्पर्धेत धावणाऱ्या प्रत्येकाला Cheer करीत होते. लहान मुलांचा उत्साह तर ओसंडून वाहत होता. त्यांचं ते Hi-five साठी हात पुढे करणे, हातात प्रेरणा देणारे फलक उंचावणे आणि ओरडून ओरडून प्रत्येकाला Cheer करणे हे सारं तुम्हाला आलेला थकवा दूर करायला मदत करत होते. कित्येक लोक त्यांच्या देशाचा ध्वज फडकावून त्यांच्या देशबांधवाना प्रोत्साहन देत होते. काही लोक तर निरनिराळी वाद्ये वाजवून धावणाऱ्या लोकांचे मनोरंजन करीत होते. रस्त्याच्या प्रत्येक चौकात जणू काही उत्सवाचं वातावरण दिसून येत होते. अशा सर्व जल्लोषात Finish Line कधी जवळ आली ते कळलं सुद्धा नाही. सर्वकाही प्लान प्रमाणे झाले होते. मैलाचा प्रत्येक टप्पा ठरवलेल्या वेळेत मी पूर्ण केला होता आणि आता फक्त ५०० मीटर्सचं अंतर माझ्यात आणि Finish Line मध्ये राहिले होते आणि याचा आनंद घेत असतानाच अचानक उजव्या पायाच्या पोटरीत जोरात कळ आली....... पाऊल पुढे पडेनासे झाले. एका क्षणात सारं काही संपल्यासारखं वाटलं... लंगडत लंगडत कसाबसा मी १०-१२ पावलं पुढे धावलो. मी माझा वेग अगदी कमी केला. शेवटच्या ४०० मीटर्स मध्ये थोडं चढण लागलं व थोडं अंतर पुढे गेल्यावर मला बाबा...... बाबा....... बाबा...... असा आवाज ऐकू आला. मागे वळून पाहिल्यावर यश आणि सेजल गर्दीतून मला हात दाखवत

होते. त्यांचं ते त्याक्षणी दिसणं मला एक नवीन ऊर्जा देऊन गेलं आणि मी Finish Line कधी ओलांडली हे कळलंच नाही.

होय! मी माझं टार्गेट पूर्ण केलं! ४ तास ३२ मिनिटे!! गेल्यावर्षी पेक्षा १२ मिनिटे कमी वेळेत मी यावर्षीची मॅरेथॉन पूर्ण केली आणि पुढच्या वर्षीच्या मॅरेथॉनसाठी एक नवीन टार्गेट सेट केलं. आई-वडिलांचा आशीर्वाद, सेजल आणि यशची साथ, मित्रमंडळीनी दिलेल्या शुभेछा सार्थ ठरवल्याचा आनंद झाला.
विठूमाऊलीचं दर्शन झाल्यावर वारकऱ्याला जसा आनंद होतो तसाच काहीसा अनुभव मी पण घेतला आणि मॅरेथॉनरुपी वारीत पुढच्या वर्षी परत सामील होण्याची आशा बाळगून मी हॉटेलवर पोहोचलो.

# नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर: झाले बहु, होतिल बहु, परंतु यासम हा!

---- सुखदा खोंबारे

'तुम्ही कितीही तळतळाट केला, तरी तोsss मीsss नव्हेच!!'... असं म्हणत रंगभूमी गाजवणारे प्रभाकर पणशीकर म्हणजे 'झाले बहु, होतिल बहु, परंतु यासम हा' ही उक्ती सार्थ ठरवणारे नटश्रेष्ठच! १४ मार्च, १९३१ रोजी जन्मलेल्या ह्या अवलियाने नाटकाच्या प्रेमापायी घर सोडले आणि मुंबई गाठली. ते मूळचे गोव्याचे. त्यांचं घराणं शास्त्री-पंडितांचे होते. मुंबईला आल्यावर पहिली काही वर्षे त्यांनी छोट्या-मोठ्या भूमिका करून संघर्षात काढली. त्यांना खरी ओळख मिळाली ती साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांच्या "तो मी नव्हेच!" ह्या नाटकामुळे.

अत्र्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेल्या आणि 'माधव काझी खटला' ह्या सत्य घटनेवर आधारित असलेल्या ह्या नाटकातील पंचरंगी भूमिका प्रभाकरपंतांनी अक्षरशः अजरामर केली. एका नाटकात एकाच नटाने पाच वेगवेगळ्या भूमिका साकारण्याची ही पहिलीच वेळ होती. जागतिक रंगभूमीवरचा हा विक्रमच म्हणावा लागेल. तसेच ह्या नाटकाच्या निमित्ताने 'फिरता रंगमंच' ही संकल्पनाही मराठी रंगभूमीवर प्रथमच वापरली गेली. कोल्हापूरच्या म्हादबा मेस्त्री यांनी ह्या फिरत्या रंगमंचाची रचना केली होती. 'लखोबा लोखंडे', 'दिवाकर दातार', 'दाजीशास्त्री दातार', 'कॅप्टन अशोक परांजपे' आणि 'राधेश्याम महाराज' ह्या अत्यंत ताकदीच्या भूमिका पंतांनी अतिशय समर्थपणे पेलल्या. किंबहुना ही पंचरंगी भूमिका त्यांनी ४० वर्षे गाजवली. ८ ऑक्टोबर, १९६२ ला या नाटकाचा पहिला प्रयोग दिल्लीमध्ये झाला होता. तेव्हापासून अगदी सन २००२-०३ पर्यंत सलग ४ दशके त्यांनी नाट्यरसिकांना आपल्या जिवंत अभिनयाने खिळवून ठेवले.



'तो मी नव्हेच' मधील 'लखोबा' जसा त्यांनी गाजवला तसाच त्यांनी साकारलेला "औरंगजेब" देखील प्रेक्षकांना कमालीचा भिडला. 'इथे ओशाळला मृत्यू' मध्ये त्यांना औरंगजेबाच्या भूमिकेत पाहणे ही खरंच पर्वणी होती. या भूमिकेसाठी त्यांनी नमाज पढण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले. नाटकाचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध ह्यातील कथानकात ७-८ वर्षाचे अंतर आहे. त्यांच्या अभिनयातून हे बारकावे त्यांनी सहजपणे टिपले. कपटी, खल प्रवृत्तीचा औरंगजेब साकारणे आणि तो इतक्या उंचीवर नेऊन ठेवणे हे शिवधनुष्य त्यांच्यासारखा महान कलाकारच पेलू शकतो.

मूलतः २.५-३ तासाच्या व्यावसायिक नाटकामध्ये इतक्या कठीण भूमिका हजारो प्रेक्षकांसमोर साकारणे हेच खूप मोठे आव्हान आहे. स्वतः रंगमंचावर जाऊन जेव्हा छोटेसे नाटुकले किंवा नाटक आपण करतो तेव्हा ह्या दिग्गज लोकांची महानता अजूनच जाणवायला लागते. त्यातून नाटक हे माध्यम असे आहे की इथे चित्रपटासारखे retakes होत नाहीत. एकदा का तुम्ही रंगमंचावर गेलात की माघार नाही. मग आपली भूमिका आणि सहकलाकारांचा अभिनय उत्तम झाला तरच नाटक प्रेक्षकांना भावते.. आणि जिथे एकापेक्षा जास्त भूमिका तुम्हाला सादर करायच्या आहेत तिथे वेळेचे योग्य व्यवस्थापन पण खूप आवश्यक ठरते. ह्या सर्व गोष्टींवर पणशीकरांनी प्रभुत्व मिळवले म्हणून ते यशस्वी कलाकार ठरले. ह्या गाजलेल्या कलाकृतीव्यतिरिक्त इतरही अनेक नाटकातून त्यांनी भूमिका केल्या. 'अश्रूंची झाली फुले', 'भटाला दिली ओसरी', 'थँक्यू मि.ग्लॅड', 'जिथे गवताला भाले फुटतात', 'मला काही सांगायचंय' ही त्यापैकी काही. मराठी, गुजराती, कन्नड अशा विविध भाषांतून त्यांनी नाटकांत कामे केली. जवळपास ८००० पेक्षा अधिक प्रयोग झाले त्यांच्या नाटकांचे!

एक दिग्गज कलावंत, श्रेष्ठ अभिनेते म्हणून तर त्यांची ओळख आहेच, पण एक चांगला माणूस म्हणून ते आम्हाला जास्त भावले. माझ्या सुदैवाने मला त्यांची ही नाटके प्रत्यक्ष पाहता आली. 'तो मी नव्हेच', 'अश्रूंची झाली फुले', 'इथे ओशाळला मृत्यू', 'गरुडझेप' अशी त्यांची नाटके पाहण्याचे भाग्य मला लाभले. त्यावेळी त्यांच्या भेटीचाही योग आला. मी १०वीत असताना आम्ही त्यांचे नाटक पाहायला गेलो होतो कोल्हापुरात. आम्ही बहिणी जेव्हा त्यांना भेटायला, स्वाक्षरी घ्यायला गेलो तेव्हा त्यांनी खूप आपुलकीने चौकशी केली. नावे विचारून तिघी काय करता विचारले. आमची नावे आणि शाळेचे नाव सांगितले आम्ही-"ताराराणी विद्यापीठ".. माझी बोर्डाची परीक्षा जेमतेम महिन्यावर आली होती. पण नाटकाच्या आवडीपायी मी गेले होते वेळ काढून. ते ऐकून त्यांनी विचारले होते, '१०वीत आहेस तर अभ्यास नाही का?'☺.. कालांतराने आम्ही जेव्हा त्यांचे दुसरे नाटक पाहायला गेलो तेव्हा त्यांनी आम्हाला ओळखले होते "ताराराणी ग्रुप" म्हणून.. आम्हाला खूप आश्चर्य वाटले होते आणि आनंद पण झाला होता. रात्री ९.३० चा प्रयोग संपायला १.३०-२ वाजायचे, पण तरीही त्यांनी प्रेक्षकांना भेटायचा कधीच कंटाळा केला नाही.. शिवाय नवख्या सहकलाकारांविषयी पण त्यांना आपुलकी वाटे.. त्यांची देखील ते स्वतः ओळख करून द्यायचे. इतका महान कलाकार असून देखील अहंकाराचा वारा कधीच शिवला नाही त्यांना. वयाच्या सत्तरीत पण त्यांचा उत्साह अवर्णनीय होता. त्यांचा अभिनय, रंगमंचावरचा वावर एखाद्या तरुणाला लाजवेल इतका सहज होता. त्यांनी दिलेली स्वाक्षरी मी खूप जपून ठेवली आहे.. 'चि.सुखदास, शुभाशीर्वादपुर्वक'...!

असा महान कलाकार आणि माणूस आपल्या रंगभूमीला लाभला हे तिचे आणि आपले भाग्यच! आचार्य अत्रेंच्याच शब्दांत सांगायचे तर “ह्या प्रभ्यासारखा नट महाराष्ट्राला दहा हजार वर्षांत पुन्हा मिळणार नाही”..!!

खरंच आहे ते.. अशा या असामान्य व्यक्तिमत्वास त्रिवार अभिवादन!!!





# मरण इतके सुंदर असू शकते..!!

--- माधुरी माटे

आजकाल अमेरिकेत सगळीकडे फ़ॉल कलर्स दिसत आहेत. आपण सगळेच नेहमी ही रंगांची उधळण बघतो. एका लेखकाने हे सुंदर रंग बघून म्हटले आहे "मरणही इतके सुंदर असू शकते". हे वाचल्यापासून दर फॉल सिझनला मला हे त्यांचे वाक्य आठवते. किती नेमके वर्णन त्यांनी केले आहे!



अमेरिकेत आल्यापासून गेली ८-१० वर्षे मी ही झाडांनी केलेली रंगांची उधळण बघत असते. दर वर्षी तीच झाडे, पण वेगळी वाटतात. अस्पेन, बीच, मेपल, बर्च, गम ट्रीज, ओक ही त्यातली काही झाडे ऑळखीची झाली आहेत.



बर्निंग बुश ही खूप छान दिसतात एकदम लाल भडक. नेहेमी हिरव्या रंगांची कुठलीतरी छटा दाखवणारी ही झाडे आत्ता मात्र कधी पूर्ण पिवळी, कधी एकाच झाडावर हिरवी पिवळी व केशरी पाने, कधी पूर्ण झाड केशरी अशी वेगवेगळी दिसतात. एव्हरग्रीन सारखी झाडे मात्र हटवादीपणाने आपला हिरवा रंग सोडायला तयार नसतात. ऑक्टोबर दुसऱ्या आठवड्यापासून हे रंग दिसायला लागतात. साधारण २ आठवडे ही रंगांची उधळण आपल्याला दिसते. हे दिवस थोडेफार इकडे तिकडेही होतात. त्यानंतर या झाडांचे एकदम खराटे होतात आणि थंडी आली असे जाणवायला लागते.

स्प्रिंग मध्ये झाडांना पालवी आल्यापासून ते उन्हाळा संपेपर्यंत या झाडांची पाने हिरवीगार असतात. तेव्हा पानांचे, क्लोरोफिल सूर्यप्रकाश व पाणी यांच्या सहाय्याने जोमाने अन्न बनविण्याचे काम चालू असते. या वेळेस सुद्धा पानात इतर रंग असतात, पण ते क्लोरोफिल मुळे लक्षात येत नाहीत. हिरवा रंग प्रॉमिनंट असतो. उन्हाळा संपला की दिवसाची लांबी कमी होते, सूर्यप्रकाश कमी होतो व हळूहळू फोटोसिंथेसिस पण कमी होते. मग हिरवा रंग मागे पडतो व इतर रंग डोकावतात व शेवटी आपले अस्तित्व दाखवतात. गाजर, केळी, बीट यांचे रंग जसे काही रंगद्रव्यांमुळे बनतात तसेच हे. हे रंग कधी कमी तर कधी जास्त दिसतात. २ आठवड्यात सगळी पाने गळून जातात. मला नेहमी वाटते हा रंगांचा सिझन चांगला १-२ महिने चालावा. पाऊस, उन्हाचे प्रमाण या दोन्हींचा रंगांवर परिणाम होतो. या खाली पडलेल्या पानांचे चांगले खत तयार होते.

इथले टूरिझम डिपार्ट्मेंट या रंगपंचमीचा फायदा घेतल्याशिवाय कसे रहाणार? नॉर्थला आधी फॉल येतो. ठिकठिकाणच्या फॉल कलर्सच्या जाहिराती येतात व टूर्स निघतात. कलर्स किती आले आहेत याचे

अपडेट इंटरनेट वर उपलब्ध असतात. स्टेट पार्क्स, नॅशनल पार्क्स व काही सिनिक रूटस खरोखर सुंदर आहेत. मिशिगन, डोअर काउंटी, मिझोरी, अलास्का इथली रंगांची उधळण फारच मोहक!

स्मोकी माउंटन एरिया मस्त दिसतो या दिवसात. डोंगरावर तिथे भरपूर झाडी आहे. त्यात वेगवेगळ्या रंगांचे मिश्रण मस्त दिसते. मेन मध्ये अकेडिया नॅशनल पार्क पण या सिझनसाठी प्रसिद्ध आहे. अशा जागा म्हणजे फोटोग्राफर व पेंटर यांची पंढरी.

काही पार्क मध्ये अगदी स्लो स्पीड चा एखादा रोड बनवतात ज्यात दोन्ही बाजूला कलरफुल झाडे असतात. पिवळ्या रंगाचा प्रकाश पडला आहे असे वाटते. मंडळी आपली फोटोग्राफीची हौस भागवून घेतात. अर्थात फोटो काही प्रत्यक्ष दृष्याला न्याय दऊ शकत नाहीत. लेकच्या बाजूला प्रतिबिंबामुळे मस्त व्हयू दिसतो. आम्ही बऱ्याच ठिकाणी जातो कलर्स बघायला. घराच्या आसपास पण खूप छान रंग दिसतात.

भारतात हिमाचल प्रदेशात थोडेफार रंग दिसतात. बाकी पानगळ म्हणजे पाने वाळतात आणि पडतात कारण आपल्याकडे तापमानात खूप फरक नसतो. यु. के. मध्ये पिवळा रंग जास्त दिसतो. आजकाल हिंदी सिनेमात बऱ्याच वेळा फॉल कलरची बॅकग्राउंड वापरतात. त्यामुळे बऱ्याच लोकांना ते माहित झाले आहेत. इथली काही छोटी मुले या पानांमध्ये मनसोक्त खेळताना दिसतात. काही मंडळी पाने वाळवून वॉल हँगिंग बनवतात.

नुकत्याच पाहिलेल्या हैदर या सिनेमात काश्मिर मधला सुंदर फॉल दिसला. मला नेहमी बहावा व गुलमोहोर फुललेले पाहिले की या फॉल कलर्सची आठवण येते.

अशा या '**जाता जाता**' आपल्याला '**रंगांचा नजराणा**' देणा-या झाडांचे मनापासून धन्यवाद.





रेखाचित्रे ------- वेद लोंबर



------ पल्लवी निकम



----- सुखदा खोंबारे



# सूर छेडिताना - Bowing the Vocal Cords!! ----- हेमा जोशी.

विल्यम शेक्सपिअरचे एक सुप्रसिद्ध वचन आहे, “If music be the food of love, play On!!” किती सुंदर कल्पना आहे. संगीत हे संपूर्ण जीवनाचा मार्ग आहे, स्फूर्ती आहे, चैतन्य आहे! म्हणूनच असे म्हणावेसे वाटते, If music be the food of love, play On!!

संपूर्ण जीवन जर संगीताच्या स्पर्शाने आणि साधनेने उजळून जाणार असेल तर ते संगीत आणि ते सूर सतत वाजत राहू देत! पंडित गजाननबुवा जोशी यांच्या संगीत क्षेत्रातील कार्याची, त्यांच्या साधनेची आणि अष्टपैलू संगीत वादन आणि गायनाची स्फूर्तीदायी गौरवगाथा गाणारे ‘Bowing the Vocal Cords’ हे मानसी जोशी-सिंह यांनी लिहिलेले पुस्तक २३ सप्टेंबर,२०१२ रोजी ब्लुमिंगटन (इलिनॉय स्टेट) येथे डॉ.विकास कशाळकर यांच्या हस्ते प्रसिद्ध झाले. संगीत कला आणि संगीत साधना यांचा दर्जा आणि क्षेत्र किती उत्तुंग आहे, विशाल आहे याची अनुभूती हे इंग्रजी भाषेत लिहिलेले सुंदर पुस्तक वाचताना येत राहते. पुस्तक हातात घेऊन वाचायला सुरुवात केली आणि थांबूच नये असे वाटले. संगीताच्या एका विशाल प्रवाहात स्वतःला झोकून दिले. त्या जिवंत चैतन्याच्या प्रवाहात वेगाने पुढे-पुढे जात राहिले. लेखिका मानसी जोशी-सिंह यांच्या उत्कृष्ट इंग्रजी भाषेत व्यक्त झालेल्या पंडित गजाननबुवा जोशींच्या अलौकिक कार्याची स्पंदने आणि संगीताचे सूर माझ्या मनात, माझ्या हृदयात असंख्य स्पंदने निर्माण करत राहिले! संगीताच्या एका विशाल सागरात मी स्वतःला हरवून बसले.

लेखिकेचे इंग्रजी भाषेवर चांगलेच प्रभुत्व असल्याचे जाणवते. त्यांची भाषा संगीताच्या सुरासारखीच मधुर आणि ओघवती आहे. इंग्रजीचा डौल आणि बाज वैशिष्ट्यपूर्ण आहे यात वादच आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे सूरसम्राट या नात्याने आपल्या गायनातून आणि व्हायोलिन या वाद्यातून सुरांचा स्वर्ग निर्माण करणारे स्वर्गीय पंडित गजाननबुवा जोशी यांच्या जीवनाचे, संगीत साधना आणि शास्त्रीय संगीतातील असामान्य कर्तृत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन होताना वाचकाचे मन मोहरून जाते, भारावून जाते.

हे पुस्तक लिहिण्याच्या मागची लेखिकेची भूमिका आणि त्यांचा दृष्टीकोन मला अतिशय महत्त्वाचा वाटला. आदरणीय पंडित गजाननबुवा जोशी यांची जन्मशताब्दी होऊन बराच काळ लोटलेला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचे उत्तुंग आणि विशाल व्यक्तिमत्त्व, स्फूर्तीदायी जीवन, संगीत क्षेत्रातील त्यांचे कार्य, कर्तृत्व आणि योगदान, तसेच ‘गुरू’ या नात्याने केलेले ज्ञानदानाचे कार्य यांचे समग्र दर्शन जगाला घडावे - संगीताची साधना करणाऱ्या आणि संगीतावर प्रेम करणाऱ्या सर्व रसिकांना त्यांची प्रगल्भ ओळख व्हावी म्हणून आणि त्यासाठी त्यांना मनाचा मुजरा देण्यासाठी आता योग्य वेळ आलेली आहे, असे त्यांना मनापासून वाटले. पंडित गजाननबुवांसारख्या श्रेष्ठ कलाकाराच्या सृजनशील संगीताच्या प्रवासाचे मर्म सर्वांना समजावे अशी लेखिकेच्या हृदयाच्या गाभ्यापासून निर्माण झालेली ओढ अंतःस्फूर्ती या लेखनाच्या मागे आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, “The goal therefore is to expose the silver of the artist's creative journey to an inspiring student of music, music lover and general reader as like!”

खरंच पंडित गजाननबुवांच्या श्रेष्ठ गायन आणि वादन कलेचे ठळक वैशिष्ट्य कोणते होते? त्यामध्ये पारंपरिक संगीत कलेचे केवळ अंधानुकरण नव्हते अथवा पूर्णपणे बंडखोर क्रांतिकारक प्रवृत्तीही नव्हती. या वैशिष्ट्याचे दर्शन घडवताना लेखिका म्हणते, “Gajananbuva represents the unique

span of an artist who fits neither the mould of a traditionally steeped persona, nor the entire self emerged revolutionary. Instead he is the conglomerate pioneer of the classic bourgeois or middle class of Maharashtrian society who, just as is true of the essence of Indian classical Music played, performed and thrived within the framework inspiring a complete and unique creative identity with the weighty accomplishments of affluent Hindustani classical gayakee of three Gharanas on one hand and the Hindustani classical Violin on the other".

'सूर छेडिताना' किंवा 'Bowing the Vocal Cords' हे पुस्तक मला का आवडले? जरा अंतर्मुख होऊन विचार केला आणि परिक्षण केले तर असे लक्षात येते की ह्या पुस्तकाचे अंतरंग, त्यातील आशयाची सखोलता किंबहुना या पुस्तकाचा आत्मा, त्यातील उत्कटता भाषेइतकीच आपल्या मनावर जबरदस्त परिणाम करतात. हे पुस्तक म्हणजे गजाननबुवांच्या चरित्र, जीवनाची गाथा नाही तर एका अत्यंत प्रगल्भ कलाकाराच्या प्रगल्भ संगीत केलेचे आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या बहुविध पैलूंचे सुंदर दर्शन आणि अविष्कार आहे! हे दर्शन जेव्हा होते तेव्हा एका शुद्ध, स्वच्छ, पवित्र आणि दिव्य आनंदाची प्रचिती येते. हा आनंद खरंच अपूर्व आहे, अनुपम आहे!

या आनंदाचा वाचकांना लाभ देणारी लेखिका स्वतःसुद्धा त्यात सर्वार्थाने आकंठ बुडालेली आहे, रंगून गेलेली आहे. त्यामुळेच 'ह्या हृदयीचे त्या हृदयी घातले' ही अनुभूती देण्याची शक्ती आणि सामर्थ्य तिच्या लेखनास प्राप्त झाले आहे. त्यात अभ्यासूवृत्ती आहे, कौशल्य आहे. हा विषय किती आत्मविश्वासाने आणि तरल पद्धतीने त्यांनी मांडला आहे याचे विलोभनीय आणि मार्मिक दर्शन या पुस्तकात घडते - पंडित गजाननबुवा जोशी हे या पुस्तकाचे स्फूर्तीस्थान आहेत, नायक आहेत. त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवताना लेखिकेने जो शोध आणि वेध घेण्याचा अत्यंत प्रामाणिक प्रयत्न केला आहे तो समजून घेणे आणि त्याचे रसग्रहण करणे हा त्या आनंदोत्सवात सहभागी होण्याचा एक तरल आणि सुंदर अनुभव आहे. स्वर्गीय गजाननबुवा जोशी यांचा जन्म ३० जानेवारी, १९११ रोजी अमावास्येला मुंबई, महाराष्ट्र येथे झाला. पण अशुभ मानल्या गेलेल्या अमावास्येला जन्माला आलेल्या अफाट बुद्धिमत्तेच्या गजाननाचे कर्तृत्व मात्र संगीत क्षेत्राला संपूर्णपणे आच्छादून टाकणारा कलाकार, संगीताचा स्वर्ग निर्माण करणारा, नव्या वाटा शोधणारा प्रणेता म्हणून सुवर्णमयी ठरले!

त्यांच्या जीवनाच्या वाटचालीत तीन मार्ग ठळकपणे जाणवतात - १.ग्वाल्हेर घराण्याच्या पारंपरिक आणि प्रगल्भ शास्त्रीय संगीताच्या पायावर बैठक तयार झालेली असली तरी तरी तेवढ्याच ताकदीच्या जयपूर-अत्रौली आग्रा घराण्याच्या शास्त्रीय संगीतावर सुद्धा त्यांनी प्रचंड प्रभुत्व मिळवले. अशा फार थोड्या श्रेष्ठ कलाकारांमध्ये त्यांचा समावेश होतो. नव्या विचारांच्या पायवाटा आणि नवी क्षितिजे विस्तृत करण्याची जिद्द आणि हिम्मत त्यांनी दाखवली. वडील अंतुबुवा यांच्याकडे ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीचे शिक्षण घेतल्यानंतर पंडित रामकृष्णबुवा यांच्याकडे पण त्या गायकीची क्षितिजे विस्तीर्ण करण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. वडिलांच्या कडक शिस्तीचे पालन करणे असह्य झाल्याने त्यांनी इचलकरंजीला जाऊन बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांकडे शास्त्रीय गायनाचे शिक्षण घेतले. जयपूर-अत्रौली घराण्याची गायकी आत्मसात केल्यानंतर मग ते आग्रा घराण्याच्या गायकीकडे वळले.

औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे गजाननबुवांच्या वडिलांचे आश्रमदाते. ते अतिशय चोखंदळ, ज्ञानी आणि उत्तम कीर्तनकार सुद्धा असल्यामुळे बुवांना व्हायोलिनवादनाची संधी मिळाली. व्हायोलिनची कसलीही माहिती नसताना विविध गीते वाजवताना त्यांची प्रगती चालूच राहिली. व्हायोलिनकडे त्यांनी वेगळ्या नजरेने कधी पहिलेच नाही. त्यांना माहिती असलेल्या शास्त्रीय संगीताच्या सुरांशी त्या व्हायोलिनचा मेळ घालून त्यांनी शास्त्रीय संगीताचे सूर छेडले. प्रथम गायचे आणि मग व्हायोलिन वाजवायचे अशी त्यांच्या रियाजाची पद्धत होती. शास्त्रीय गायन सतत मनात असल्याने व्हायोलिनवर मीण्ड, गमक आणि खटका यांच्यासारख्या परिणामकारक तेत्रकौशल्याविषयी लिहिताना लेखिका म्हणते की त्यांच्या व्हायोलिन वादानावर 'गाणारे व्हायोलिन' असे शिक्कामोर्तब झाले. जणू काही व्हायोलिनच्या तारा छेडण्याऐवजी ते गळ्यातील सूर छेडत आहेत असे वाटे. "As if he was bowing the vocal cords instead of strings of the instrument!"..

बुवांचे व्हायोलिन वादन अतिशय मधुर, दमदार आणि वजनदार स्वरूपाचे होते. त्यांच्या वादनात ग्वाल्हेर गायकी, जयपूर-अत्रौली गायकी आणि आग्रा गायकीचे अतिशय सुंदर असे प्रभावी मिश्रण असे.. त्यामुळे त्यांची ओळख बालगंधर्वांप्रमाणे 'व्हायोलिन गंधर्व' अशीच होऊ लागली. वझे यांच्याकडेही ते शिकले तसेच उस्ताद भुर्जीखान यांच्याकडे जयपूर-अत्रौली घराण्याचे शिक्षण त्यांनी घेतले. त्यानंतर आग्रा घराण्याचे उस्ताद विलायत हुसेन खान यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण झाले. 'त्रिवेणी संगमच जणू' असे या सर्व शोधांचे आणि प्रयत्नांचे वर्णन करता येईल.

२. त्यानंतर १९२३ मध्ये औंधचे राजेसाहेब यांच्या कीर्तनात संपूर्णपणे अनोळखी असलेल्या व्हायोलिन या वाद्याची साथ ते करू लागले. कोणतेही मार्गदर्शन नसताना व्हायोलिन वादनावर त्यांनी असामान्य प्रभुत्व आणि कौशल्य प्राप्त केले. ऑल इंडिया रेडियो, मुंबई येथे Vocal and violin Recitals केल्या.

३. 'विद्यादानी' किंवा गुरू या नात्याने त्यांनी आपले ज्ञान आणि कौशल्य त्यांचे शिष्य आणि अनुयायांपर्यंत पोहचविले.  त्यांना स्वतःला जरी संगीत साधनेत अत्यंत खडतर तपश्चर्या करावी लागली तरी सर्व प्रकारच्या परिस्थितीला सामोरे जाऊन संगीत शिक्षण घेण्याच्या ओढीने आलेल्या विद्यार्थ्यांवर उगाचच अटी न घालता मुक्त मनाने आणि प्रसन्नपणे त्यांच्या कौशल्याचा वर्षावच केला. संगीत क्षेत्रात त्या विद्यार्थ्यांचे ज्ञान किती आहे, तो कोणत्या घराण्याचा आहे अशा शंका न काढता, तो शिक्षण घेण्याच्या ज्या ओढीने आला आहे ती ओढ, तो उत्साह आणि आतुरता महत्त्वाची समजून त्या विद्यार्थ्याचे प्रगतीचे मार्ग त्यांनी सुकर केले. त्यांच्या वडिलांचे अध्यात्मिक गुरू 'शिवानंद' यांच्या नावाने स्वामी शिवानंद ट्रस्ट ही संस्था स्थापन करून औंध येथे संगीत महोत्सव सुरु केला.

वडिलांच्या म्हणजे अंतुबुवांच्या मार्गदर्शनाखाली ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीने बुवांच्या शास्त्रीय गायनाची सुरुवात झाली. त्यात ते खरोखरी आकंठ बुडाले. महाराष्ट्रात ग्वाल्हेर गायनपद्धती साधी, सरळ अशा हरिदास पद्धतीची होती. परंतु ग्वाल्हेरमधील पद्धत ही अतिशय गुंतागुंतीची आणि अवघड असून त्यावर टप्पा पद्धतीचा प्रभाव जास्त होता. या गायकीच्या चौकटीपलीकडे बुवा फारसे गेले नाहीत. तबला वादनाचे कौशल्यही त्यांनी प्राप्त केले होते. त्यांचे ते कौशल्य इतके असामान्य होते की सुप्रसिद्ध तबलावादक उस्ताद थिरकवा यांनी त्यांना 'तालिया गवई' असा मनाचा किताब बहाल करून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला होता. गजाननबुवा खऱ्या अर्थाने पूर्णत्वाला गेलेले असामान्य कलाकार होते. त्यांचे

गायन आणि वादन दोन्ही मधुर स्वरूपाचे होते. त्यांची तालाची जाण अतिशय परिपक्व आणि प्रगल्भ होती. त्यांच्या या अलौकिक पैलूंचे वर्णन लेखिकेने फार मार्मिकपणे केले आहे. त्या म्हणतात, "गजाननबुवांची बुद्धिमत्ता त्यांच्या गायनातून जरी प्रतिबिंबित होत असली तरी त्यांचे हृदय मात्र व्हायोलिन वादनातूनच प्रतिबिंबित होत असे."


लेखिकेने गजाननबुवांचे 'गुरू' या नात्याने केलेल्या योगदानाचे फार सुंदर वर्णन केले आहे. "ते एखाद्या प्रचंड वेगाने कोसळणाऱ्या जलप्रपातासारखे होते. कोणताही भेदभाव न करता संगीत शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे ते बाहु पसरून खुल्या दिल्याने स्वागत करीत असत, मनात आर्थिक लाभाची तर कसलीच अपेक्षा नसे. जणू संगीताचे शिक्षण देण्यासाठीच त्यांचा जन्म झाला होता. गुरू या शब्दाचा अर्थ अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करणारा असा आहे. संगीताची पार्श्वभूमी नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची त्यांची पद्धत फार साधी होती. ठेक्यावर लक्ष ठेवणे, तानपुरा वाजवणे अथवा त्यांच्या स्वतःच्या रियाजावर लक्ष केंद्रित करणे यासारख्या गोष्टींचा त्यात समावेश असे. बुवांचा favourite formula म्हणजे 'Learn from association' हा होता. संगीताची साधना चोवीस तास केली पाहिजे - म्हणजे याचा अर्थ 'जेव्हा तुम्ही संगीत शिकता तेव्हा संगीताचाच विचार करा, कारण संगीत आपल्यापेक्षा फार महान आहे. आपल्याला वाटते त्यापेक्षाही प्रचंड आहे'.

ते विद्यार्थ्यांना खूप बंदिशी शिकवीत असत आणि त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमात भाग घ्यायला लावीत असत. ते त्यांना त्यांच्याबरोबर गायला लावीत. ते सांगत असत, माझी केवळ कॉपी करू नका. जे तुम्हाला पूरक असेल आणि जेवढे गाता येईल तेवढेच करा किंवा वाजवा. शास्त्रीय संगीत आणि साधना याबद्दल गुरू या नात्याने बुवांचा दर्जा आणि दृष्टीकोन फार उच्च दर्जाचा होता. त्यांच्या या पैलूचे वर्णन करताना लेखिका म्हणते, "Classical music and its Sadhana is not just a skill science. It is a life science. It is the journey and the collective consciousness of society and the path to enlightenment for those unable to experience all that is possible, all that human life is expected to and capable of going through!!

"Bowing the vocal Cords" हे पुस्तक इंग्रजी भाषेत लिहिलेले असल्यामुळे भारतात तसेच परदेशात शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकाच्या लेखिका मानसी जोशी-सिंह पुणे विद्यापीठातून कॉम्प्युटर क्षेत्रातील पदवीधर आहेत. गेली बारा वर्षे त्यांचे वास्तव्य अमेरिकेत ब्लुमिंगटन, इलिनॉय आणि सध्या ऑस्टिन, टेक्सास मध्ये आहे. त्या AMD (Advanced Micro Devices) या सुप्रसिद्ध कंपनीमध्ये आय.टी. प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून काम करतात. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताची अतिशय आवड असल्यामुळे पंडित डॉ.विकास कशाळकर आणि सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायिका श्रीमती आरती अंकलीकर-टिकेकर यांच्याकडे त्यांचे शास्त्रीय संगीताचे शिक्षण चालू आहे. शास्त्रीय संगीताच्या अनेक मैफिलींमध्ये त्यांनी अमेरिका आणि भारतात भाग घेतला आहे. अमेरिकेत इलिनॉय स्टेटमध्ये "इंडियन म्युझिक सोसायटी" या संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा सह-संस्थापक या नात्याने फार महत्त्वाचा वाटा आहे. संगीत कलेला उत्तम दर्जा आणि उत्तेजन देण्याच्या हेतूने नवनवीन कलाकारांना संधी मिळावी म्हणून या संस्थेतर्फे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. भारतातून प्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक आणि वादकांना आमंत्रित केले जाते. साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे पुणे येथे ललित लेखन स्पर्धा झाली होती. त्यांच्या गुरू श्रीमती आरती अंकलीकर-टिकेकर

यांच्या अमेरिकेतील वास्तव्यात त्यांना जी स्फूर्ती आणि मार्गदर्शन मिळाले त्यावर आधारित लिहिलेल्या 'मिले सूर मेरा तुम्हारा' हा त्यांचा लेख 'सुवासिनी' या दिवाळी अंकात (२०११) प्रसिद्ध झाला होता. या लेखाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. त्यांनी अतिशय दर्जेदार स्वरूपाचे डिजिटल वर्क आणि सुंदर वेबसाईटस पण केलेल्या आहेत. आपल्या वडिलांच्या बरोबर ABHI123 हे पुस्तक पण co-writer या नात्याने इंग्रजी भाषेमध्ये लिहिले आहे.

लेखिकेने आदरणीय पंडित गजाननबुवा जोशींचे जीवनचरित्र फार सुंदर, ओघवत्या आणि मार्मिक पद्धतीने लिहिलेले आहे. इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व आणि कौशल्य संपूर्ण पुस्तक वाचताना अतिशय उत्कटपणे जाणवते. अष्टपैलू कलाकाराच्या जीवनावर एवढे सुंदर पुस्तक लिहिणे हे खरोखरीच फार मोठे आव्हान आहे. ते आव्हान स्वीकारून पूर्ण करण्यात मानसी जोशी-सिंह निश्चितच यशस्वी झाल्या आहेत! भविष्यकाळातही त्यांच्या हातून असेच सुंदर लेखन व्हावे अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी त्यांना मनोमन शुभेच्छा देते!!



# चला निसर्गाच्या सान्निध्यात...!

----- वंदना बाजीकर

जेव्हा भारतासारख्या निसर्गरम्य देशातून आपण ब्लूमिंग्टन – नॉर्मलला येतो तेव्हा सगळ आयुष्यच बदलते. तुम्ही जर माझ्यासारखे जंगलात फेरफटका मारणारे, निसर्गावर प्रेम करणारे आणि निसर्गाशी जवळीक ही एक जीवनावश्यक गोष्ट मानणारे असाल तर ब्लूमिंग्टन मध्ये येऊन ती उणीव जाणवायला लागते आणि अगदी नाराज व्हायला होते.

त्यातूनच मी शोध घेतला ब्लूमिंग्टनपासून अगदी जवळ असलेल्या निसर्गरम्य जागांचा... Parklands आणि Sugar Grove/Funks Grove या ठिकाणी तुम्ही सहकुटुंब जाऊन चालू शकता असे अगदी सोपे आणि निसर्गरम्य Trails आहेत.

*Parkland* ला जायचे असेल तर ही वेबसाईट जरूर पहा - **http://www.parklandsfoundation.org** Spring मध्ये इथे Blubells चे सुंदर गालिचे पसरलेले असतात. उन्हाळ्यात अनेक जंगली फुले अप्रतिम नेत्रसुख देतात. Sugar Grove/Funks Grove या ठिकाणांसाठी ही वेबसाईट जरुर पहा - **http://sugargrovenaturecenter.org**

या ठिकाणी सुंदर Trails तर आहेतच.. पण उत्तम असे Birdwatching Center आणि आकाश निरीक्षण केंद्र सुद्धा आहे. ही दोन्ही ठिकाणे ब्लूमिंग्टनपासून खूप जवळ आहेत. आपल्या लहान मुलांना सुरवातीपासून निसर्गावर प्रेम करायला शिकवले तर त्यांचे आयुष्य नक्कीच खूप समृद्ध होईल हे मी स्वानुभवाने सांगते आहे. निसर्गाशी जवळीक म्हणजे आत्मपरीक्षणाची संधी आणि चिरंतन सुखाचा ठेवा. चला तर निसर्गाच्या सान्निध्यात...!

**Spiderwort**





← **Wild Geraniums**



**Jack in the Pulpit**

## Dwarf Larkspur



## Bluebell carpet



# Everybody needs....

---- Sukhada Khombare

Everybody needs a friend,
who can be with you till the end
    Everybody needs a companion,
    who can listen your opinion
Everybody needs a sister,
who behaves as your master
    Everybody needs a guide,
    who can tell you the right and wrong side
Everybody needs a life partner,
who can understand you better
    Everybody needs a brother,
    who can teach you to proceed further
Everybody needs a teacher,
who can develop your nature
    Everybody needs a friend circle,
    who can be thought as a Miracle
Everybody needs grandparents,
who can bless you in all moments
    Everybody needs all these relations,
    who can share our joy, worries and tensions!




**मराठी मंडळ ब्लुमिंग्टन-नॉर्मल**

www.bmmandal.org